::- <u>जाहिर सूचना</u> -::

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५

<u>प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी</u>

(सुधारीत कार्यक्रमानूसार)

ज्याअर्थी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक -२०२५ करीता राज्य निवडणुक आयोगाचे आदेश क्रमाक रानिआ/मनपा/२०२५/प्रक्र.४१/का-५, दि.२६.११.२०२५ अन्वये मतदार यादी तयार करणे व प्रसिध्द करणे बाबत सुधारीत कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.

त्याअर्थी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रं. ०१ ते २० मधील जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, दि. ०१ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या, ८६ उत्तर नांदेड व ८७ दक्षिण नांदेड, विधान सभा मतदार संघाच्या मतदार यादीवरुन, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.१ ते २० च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी तयार केलेली प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी पूर्वीच्या कार्यक्रमानूसार दिनांक २०.११.२०२५ रोजीपासून कार्यालयीन वेळेत जनतेच्या माहितीसाठी व पाहण्यासाठी मनपाच्या क्षेत्रिय कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

तथापी मा. राज्य निवडणुक आयोगाचे सुधारीत आदेशानूसार प्रारुप मतदार यादी संदर्भात हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक ०३.१२.२०२५ असून संबधित क्षेत्रिय कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल कराव्यात. उक्त दिनांकानंतर प्राप्त होणा-या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

तसेच मतदार यादी पाहण्यासाठी प्रशिक्षण हॉल, खोली क्रमांक ३०५, तिसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, मनपा नांदेड येथे उपलब्ध आहे. तसेच महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nwcmc.gov.in वरही याद्या उपलब्ध आहेत.

दिनांक :- २८.११.२०२५

ठिकाण :- नांदेड.

उप आयुक्त (प्रशासन) तथा

प्राधिकृत अधिकारी ( मतदार यादी)

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.